पावसाळ्यात अनधिकृत बांधकामे
न पाडण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक:अनबां १७९७/११३/प्र.क्र.३३/९७/नवि ११ अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २४ जून, १९९७.

परिपत्रक

अनधिकृत बांधकामाचे निष्कासन कठोरपणे करावे याबाबत शासनाने वेळोवेळी सर्वसंबंधितांना सूचना दिलेल्या आहेत. अनधिकृतपणे बांधकामे करुन शासकीय, निम शासकीय किंवा खाजगी जमिनी बळकावण्याच्या वृत्तीला पायबंद घालणे आवश्यक आहे. त्याबाबत शासनाने वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. पावसाळ्यास सुरुवात झाली असल्याने आता निवासी बांधकामाचे निष्कासन केल्यास रहिवाशांचे संसार उघड्यावर पडतील व त्यांचे हाल होतील. या प्रश्नांमध्ये मानवतेच्या दृष्टीकोनातून पाहण्याची शासनास नितांत गरज भासते. त्यामुळे या परिपत्रकाद्वारे पावसाळा असेपर्यंत म्हणजे सप्टेंबर १९९७ अखेरपर्यंत अनधिकृत निवासी बांधकामे, ज्या ठिकाणी कुटुंबाचे वास्तव्य आहे अशी बांधकामे निष्कासन करण्याची कार्यवाही तात्पुरती थांबवावी असे शासनाने ठरविले आहे. परंतु पावसाळ्याच्या संधीचा फायदा घेऊन जर अनधिकृत - नवीन बांधकामे करण्याचे काम सुरु असल्यास ती तातडीने पाडण्यात यावीत. फक्त जेथे कुटुंबांचे वास्तव्य आहे अशी अनधिकृत बांधकामे निष्कासित करु नयेत. मात्र वाणिज्यिक प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी अनधिकृत बांधकामे लगेच पाडण्यात यावीत. वाढिवलद अनधिकृत बांधकामे उभी करण्याची प्रक्रिया चालू असताना अशी बांधकामे पाडण्यास कोणतीच हरकत नाही. वास्तविक याविषयी प्रभावी प्रतिबंधक कार्यवाही व्हावी.

शासन असेही स्पष्ट करु इच्छिते की, पावसाळ्याच्या कालावधीमध्ये एकही नवीन अनधिकृत बांधकाम उभे राहणार नाही याची खबरदारी सर्वसंबंधितांनी घ्यावी व पावसाळ्यानंतर अनधिकृत बांधकामाचे निष्कासन करण्याची कार्यवाही जोमाने पुढे चालू ठेवावी.

थोडक्यात, खालील अनाधिकृत बांधकामे निष्कासित करण्याची किंवा पाडण्याची कार्यवाही पावसाळ्यात देखील चालू ठेवण्यात यावी.

पाडण्याची कार्यवाही.

[२] अनाधिकृत बांधकामे ज्यात वस्ती नाही किंवा जी वापरात नाहीत.

[३] वाणिज्यिक प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी अनाधिकृत बांधकामे.

<u>या परिपत्रकाची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.</u>

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ के. नलिनाक्षन् ]
प्रधान सचिव.